संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १६.०३.२०२६ | अंक नं. २८७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# ग्रामीण भागात संध्याकाळचे लोडशेडिंग सुरु

## ६ ते रात्री ८.३० पर्यंत वीजपुरवठा बंद; परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम; गॅस टंचाईचा परिणाम; वीजेची मागणी वाढली

नगर – गॅस टंचाईमुळे नागरिकांकडून इलेक्ट्रिक शेगड्यांचा वापर सुरु केल्याने विजेची मागणी वाढली आहे. निर्मितीपेक्षा मागणी अधिक झाल्याने ग्रामीण भागात लोडशेडिंग वाढविण्यात आले आहे. सध्या कृषी पंपावरील वाहिन्यांवर हे लोडशेडिंग लागू करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली. महावितरणच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडून राज्यभरात सायंकाळी ६ ते रात्री ८.३० या वेळेत कृषी पंपांवरील वाहिन्यांचा पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १५ मार्चपासून हे लोडशेडिंग लागू करण्यात आले आहे. तर काही ठिकाणी सिंगल फेज वीजपुरवठाही बंद ठेवला आहे.

दरम्यान, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असतानाच संध्याकाळच्या वेळेत लोडशेडिंग लागू करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होत आहे. परीक्षा काळात लोडशेडिंग करु नये, अशी पालकांकडून होत आहे. रात्रीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरु असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोडशेडिंगच्या वेळा बदलण्यात यावा आणि रात्रीचा वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील लोडशेडिंग संध्याकाळी ६ ते रात्री ८.३० पर्यंत जरी वाढवण्यात आले असले तरी गावठाण भागातील वीज चालू राहणार आहे. गावठाण हद्दीबाहेरही काही ठिकाणी सिंगल फेज वीज पुरवठा चालू राहणार आहे. त्यामुळे नागरिकांना या लोडशेडिंगचा फारसा त्रास होणार नाही. मात्र, वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांना याचा परिणाम जाणवू शकतो, असेही अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.




## खांबावरील टीव्ही व इंटरनेट केबल, अनधिकृत फलक तात्काळ काढावे अन्यथा गुन्हे दाखल करणार : आयुक्त

नगर – शहरातील महामार्ग व प्रमुख रस्त्यांवर असलेल्या महापालिकेच्या मालकीच्या पथदिव्यांच्या खांबावरील इंटरनेट व टीव्ही केबल, विनापरवाना फलक तत्काळ काढून घ्यावेत. महापालिकेने विनापरवाना केबल टाकणाऱ्या कंपन्यांवर व फलक लावणाऱ्या जाहिरातदारांवर कारवाई सुरू केली आहे. विनापरवाना फलक व केबल तोडून हटवण्यात येत आहेत. तसेच, फलक लावणाऱ्यांवर व केबल टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

शहरात सर्वत्र महापालिकेचे पथदिव्यांचे खांब आहेत. शहरातील जाणाऱ्या प्रमुख रस्ते व महामार्गावरही पथदिव्यांचे खांब आहेत. छत्रपती संभाजीनगर महामार्ग, पुणे महामार्ग, मनमाड महामार्गावर, तसेच उड्डाणपुलाच्या खांबावर अनेक टीव्ही केबल कंपन्या व इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांकडून त्यांच्या केबल टाकण्यासाठी बेकायदेशीरपणे महापालिकेच्या खांबांचा वापर केला जात आहे. सदर खांबांवरून महापालिकेच्या पथदिव्यांच्या वीज वाहक तारा टाकलेल्या असतात. त्याच ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता धोकादायक पद्धतीने या केबल टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे एखादा अपघात किंवा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पथदिव्यांच्या खांबांवरून या केबल हटवणे आवश्यक आहे. तसेच, नव्याने उभारण्यात आलेल्या पथदिव्यांच्या खांबांवर जाहिरातीचे फलक लावण्यात येत आहेत. यापूर्वी असे फलक लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. येत्या काळात ही कारवाई तीव्र करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील सर्व टीव्ही व इंटरनेट केबल टाकणाऱ्या कंपन्यांनी तात्काळ सदरच्या केबल काढून घ्याव्यात. ज्यांनी अनधिकृत फलक लावले आहेत, त्यांनी ते काढून घ्यावे. महापालिकेने अशा केबल व फलक हटवण्यासाठी कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. केबल कट करून काढण्यात येत आहेत. या कारवाईमुळे कोणतीही सेवा विखंडित झाल्यास, यामुळे कोणत्याही प्रकारचे व कोणाचेही नुकसान झाल्यास त्याला महापालिका जबाबदार राहणार नाही. तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करून कारवाई करेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.












# गृहिणी

## आरोग्य

### कमी वेळ झोपत असाल तर...

आजच्या धावपळीच्या जीवनात, आपण अनेकदा काम आणि मनोरंजनाच्या भरात आपली झोप सोडून देतो. रात्री उशिरा मोबाईल फोन असो किंवा ऑफिसचे काम असो, झोपेचा अभाव आता एक मूक हत्यार बनत चालला आहे. आरोग्य तज्ञ म्हणतात की जर तुम्हाला पुरेशी झोप मिळत नसेल तर तुम्ही नकळत तुमच्या शरीराला गंभीर आजारांचे घर बनवत आहात. झोपेच्या कमतरतेसाठी केवळ कामाचा ताणच नाही तर आपली वाईट जीवनशैली देखील जबाबदार आहे. झोपेच्या अगदी आधी, मोबाईल आणि टीव्हीचा निळा प्रकाश मेंदूला झोपू देत नाही. भविष्याची चिंता आणि मानसिक ताण हे गाढ झोपेतील सर्वात मोठे अडथळे आहेत. रात्री उशिरा जड जेवण, जास्त कॉफी/चहा पिणे आणि शिफ्ट ड्युटीमुळे शरीराचे घड्याळ बिघडते. यासाठी डिजिटल डिटॉक्स: झोपण्यापूर्वी किमान १ तास आधी, मोबाईल आणि गॅझेट्सपासून मुक्त व्हा. सुट्टी असली तरीही, दररोज झोपण्याची आणि उठण्याची वेळ सारखीच ठेवा. रात्रीचे जेवण हलके ठेवा आणि झोपण्यापूर्वी ३ तास आधी खा. शांत वातावरण: बेडरूममध्ये अंधार आणि शांतता ठेवा. आरामदायी बेड निवडा. दिवसा शारीरिक हालचाल करा पण झोपण्यापूर्वी कठोर व्यायाम टाळा.

## पाककला

### काजू-बदामाचे लोणचे

**साहित्य :** एक कप काजू, एक कप बदाम, एक चमचा काळे मीठ, एक चमचा बडीशेप, एक चमचा काश्मिरी लाल तिखट, एक चमचा गरम मसाला, अर्धा चमचा हळद, एक चमचा जिरे, एक चमचा मीठ, दोन चमचे आमसूल पावडर, २५० ग्रॅम साखर, चार वेलची, एक लिंबाचा रस किंवा एक चमचा व्हिनेगर

**कृती :** सर्वात आधी एक कढई गॅस वर ठेऊन त्यामध्ये एक कप पाणी घालावे. व साखर घालावी. आता तयार होणाऱ्या पाकमध्ये वेलची पूड घालावी. हा पाक उकळवून घ्यावा. आता यामध्ये काजू बदाम घालावे व हे मिश्रण शिजवून घ्यावे. आता यामध्ये सर्व मसाले टाकून शिजवून घ्यावे. काजू बदाम शिजले का हे पाहून घ्यावे. जेव्हा हे मिश्रण घट्ट व्हायला लागेल तेव्हा गॅस बंद करावा. हे लोणचे थंड होण्याकरिता ठेवावे. तसेच लोणचे थंड झाल्यानंतर त्यामध्ये व्हिनेगर किंवा लिंबाचा रस टाकावा. तर चला तयार आहे काजू बदामाचे आंबट गोड लोणचे जे तुम्ही पराठा सोबत सर्व्ह करू शकतात.

## वास्तू

### स्टडी रुमची दिशा

मुलं जेथे अभ्यास करतात त्या खोलीची दिशा खूप महत्त्वाची आहे, कारण त्याचा परिणाम त्यांच्या एकाग्रतेवर आणि यशावर होऊ शकतो. पश्चिम आणि नैऋत्य मधला कोपरा अभ्यासासाठी उत्तम जागा आहे. तुम्ही ईशान्य किंवा पूर्व दिशेला स्टडी रूम देखील बनवू शकता. यामुळे मुलांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यास आणि चांगले निकाल मिळण्यास मदत होईल.

## सौंदर्य

कोरफड एक ताजे पान कापून आणि त्याचे जेल काढा. त्यानंतर हे जेल चेहऱ्यावर लावा. चेहऱ्यावर जेल लावल्यानंतर चेहरा सुकण्यासाठी सोडा, कोरडे झाल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. तुमची त्वचा सुंदर होण्यास मदत होईल.

## सल्ला

चहा करताना ६ कप पाण्यात एक अष्टमांश टीस्पून मीठ घालून चहा प्यायला, तर चहाची चव चांगली लागते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६

**शिवरात्रि, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, शततारा ३०।०९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल.

**वृषभ :** जोडीदाराशी वादविवाद टाळा. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल.

**मिथुन :** अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. आरोग्य उत्तम राहील. मान-सन्मानात वाढ होईल.

**कर्क :** कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल.

**सिंह :** एखाद्या मित्राचे प्रशंसनीय सहकार्य मिळेल. आरोग्य उत्तम राहील. काही काळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील.

**कन्या :** वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण.

**तूळ :** संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस. शत्रू वर्गापासून दूर राहा. आपली योजना बनवण्यात सावधगिरी बाळगा.

**वृश्चिक :** दिवस संमिश्र जाईल. आपल्या क्रोधावर संयम ठेवाल आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळाल.

**धनु :** आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. मागील उधारी वसुल होईल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करेल.

**मकर :** न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील.

**कुंभ :** आपल्या करीयरमधील ध्येयपूर्ती कराल. आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात.

**मीन :** आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

## शब्दगंध क्र. ७३८८ सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७३८७ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मध्ये खंड न पडता एकसारखी पडणारी धार ५) दगडाचा लहान तुकडा ६) पंचांगातील एक भाग; अर्धी तिथी ७) एक प्राणी; माकड ८) वाईट सवय; खोड १०) झाडाचे पान ११) मुंबईतील एक उच्चभ्रू लोकांचा भाग १४) न तुटता; अखंड १७) कलम; गोष्ट १८) पोलिसांतील एक पद २१) तपास; शोध; ठावठिकाणा; पत्ता २२) अंगणात वगैरे केलेले शेणाच्या पाण्याचे सिंचन; पखरण २३) तप्त; तापलेले; लसलशीत

**उभे शब्द :-** १) गोळा करणे; जमविणे २) चलाख; ताजातवाना; हुशार ३) पिकात वाढणारे अनावश्यक गवत ४) एक प्रकारची दारू ५) प्रयत्न; खटाटोप; प्रयास ९) मनसब धारण करणारा १२) एक बंगाली आडनाव २३) विंचवातील एक प्रकार; मोठा विंचू १५) निष्णात; प्रवीण; कुशल १६) धैर्याचे काम; धाडस १७) लहान मूल १९) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर २०) फळ, ऊस वगैरेतील द्रव; स्वाद २१) एक क्षुल्लक कीटक; मक्षिका

# ＊ ＊ ＊ ＊ ＊ ＊ मुलांचे विश्व ＊ ＊ ＊ ＊ ＊ ＊

**सुविचार :** मदतीचा हात प्रसिद्धीसाठी नाही तर समाधानासाठी असावा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### गिधाड हा पक्षी किती शक्तिशाली आहे?

गिधाडाची उडण्याची क्षमता सर्वांमध्ये उत्सुकतेचा विषय आहे. गिधाड एक अतिशय शक्तिशाली पक्षी आहे. तसेच गिधाड हा त्याच्या अद्भुत उड्डाण आणि ताकदीसाठी प्रसिद्ध आहे. या पक्ष्यामध्ये माउंट एव्हरेस्ट पेक्षाही उंच उडण्याची क्षमता आहे. यासोबतच, पर्यावरण स्वच्छ ठेवण्यातही त्याची मोठी भूमिका आहे. गिधाड, विशेषतः अँडियन गिधाडे आणि हिमालयीन गिधाडे, त्यांच्या आश्चर्यकारक उड्डाण उंचीसाठी ओळखले जातात. हे पक्षी १०,००० मीटर वर उडू शकतात, जे माउंट एव्हरेस्टपेक्षा खूप उंच आहे. प्रत्यक्षात, गिधाडांना लांब आणि रुंद पंख असतात, जे ३ मीटर पर्यंत पसरू शकतात. हे पंख त्यांना उष्ण वारे, म्हणजेच उष्ण हवेचा वापर करण्यास मदत करतात. सूर्याच्या उष्णतेने निर्माण होणारे हे वारे गिधाडांना पंख न फडफडवता हवेत उडण्यास परवानगी देतात. अशा प्रकारे, ते कमी उर्जेने लांब अंतर आणि उंची व्यापतात. त्यांची श्वसन प्रणाली देखील आश्चर्यकारक आहे. गिधाडांच्या फुफ्फुसांमध्ये आणि रक्तात ऑक्सिजन वाहून नेण्याची शक्ती अशी आहे की ते कमी ऑक्सिजन उंचीवर देखील सहजपणे उडू शकतात. हेच कारण आहे की ते अशा ठिकाणी पोहोचतात जिथे इतर प्राणी जाणे कठीण आहे.

तसेच गिधाडांच्या उड्डाण शक्तीचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची सहनशक्ती. ते तासनतास न थांबता उडू शकतात. हिमालयाची उंच शिखरे असोत किंवा मैदानी प्रदेश, गिधाडे सर्वत्र अन्नाच्या शोधात बाहेर पडतात. त्यांच्या या गुणामुळे ते एक उत्तम शिकारी आणि निसर्गाचे स्वच्छ करणारे बनतात. गिधाडांची शक्ती केवळ उड्डाणापुरती मर्यादित नाही, तर त्यांचे शारीरिक गुण आणि पर्यावरणातील त्यांचे योगदान त्यांना खास बनवते. गिधाडांची दृष्टी इतकी तीक्ष्ण असते की ते अनेक किलोमीटर अंतरावरून जमिनीवर पडलेले मृत प्राणी पाहू शकतात. याशिवाय, गिधाडांचे पोट देखील आश्चर्यकारक आहे. ते कुजलेले मांस खाऊ शकतात, कारण त्यांच्या पोटातील आम्ल जीवाणू आणि विषाणूंना मारते. हेच कारण आहे की पर्यावरण स्वच्छ ठेवण्यात गिधाडे इतकी मोठी भूमिका बजावतात. गिधाडांची संख्या कमी झाली आहे

गिधाडांना निसर्गाचे स्वच्छता करणारे म्हटले जाते. ते मृत प्राणी खाऊन पर्यावरण स्वच्छ ठेवतात आणि रेबीजसारख्या आजारांचा प्रसार रोखतात. १९९० च्या दशकात डायक्लोफेनाक या औषधामुळे भारतात गिधाडांची संख्या खूप कमी झाली. यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण झाले आणि रोग वाढले.

## पाच शब्द

तिरुमल हा तेनाली रामाचा जवळचा मित्र होता. हंपी राज्यात त्याची एक प्रसिद्ध सराय होती, ज्याचे नाव दक्षिणचा सूर्य होते. तिरुमल त्याच्या सरायवर खूप नाराज होता. त्याच्या सरायमध्ये सर्व सुविधा, स्वादिष्ट जेवण, उत्तम राहण्याची व्यवस्था आणि स्वच्छता होती, परंतु तरीही, त्यात पाहिजे तितके ग्राहक नव्हते. सरायचा खर्च भागवणे कठीण होते.

निराश झालेल्या तिरुमलने एके दिवशी त्याचा मित्र तेनालीरामाचा सल्ला घेण्याचे ठरवले.

तेनालीरामाने तिरुमलचे लक्षपूर्वक ऐकले आणि म्हणाला, ते खूप सोपे आहे. तुम्ही फक्त सरायचे नाव बदला. ते अशक्य आहे. तिरुमल म्हणाला, पिढ्यानपिढ्या, ही सराय विजयनगर राज्यात याच नावाने प्रसिद्ध आहे.

मला हे सर्व माहित नाही. जर तुम्हाला ही सराय चांगली चालवायची असेल तर तिचे नाव बदला.

याला पंचवणी असे नाव द्या आणि सरायच्या मुख्य प्रवेशद्वारावर सहा मोठ्या घंटा लावा.

तेनालीराम म्हणाला, सहा मोठ्या घंटा! तू काय म्हणतोस मित्रा! ही एक विचित्र कल्पना आहे. नाव पंचवणी आहे, आणि सहा घंटा लावा. तिरुमला आश्चर्यचकित झाला.

हे करून पहा आणि मग मला सांगा,' तेनालीराम हसत म्हणाला.

बरं, तिरुमलाने तेनालीने सांगितल्याप्रमाणे केले आणि मग असे काहीतरी घडले...

सरायजवळून जाणारा कोणताही प्रवासी - जो कोणी सरायचे नाव वाचेल आणि सहा घंटा पाहील - तो सरायच्या मालकाला नाव दुरुस्त करण्याचा सल्ला देण्यासाठी धावत आत जायचा. प्रत्येकाला वाटले की कदाचित यापूर्वी कोणीही चूक लक्षात घेतली नसेल.

सरायच्या आतील स्वच्छतेमुळे आणि मालकाच्या आदरातिथ्याने खूश झालेले बहुतेक प्रवासी तिथेच राहतील. तिरुमलची सराय लवकरच हंपीमधील सर्वात मोठी बनली. प्रवाशांची सतत गर्दी होती. तेनालीरामाच्या थोड्याशा हुशारीने थिरुमलचे नशीब बदलले.

## जीवन का अमृत (भाग १)



भौतिक जीवन के दौरान फिलिप ने रखा, स्वामी हमें हमारे पिता के दर्शन कराओ और वह हमारे लिए पर्याप्त होगा।

ईसामसीह ने उत्तर दिया, मैं तुम्हारे साथ इतने लंबे समय से हूँ और तुमने मुझे नहीं पहचाना फिलिप ? तुमने कैसे कहा कि पिता के दर्शन कराओ ? क्या तुम्हें विश्वास नहीं कि मैं पिता (परमपिता) में बसता हूँ और वह मुझमें? मैं और मेरा पिता एक ही हैं। जिसने मुझे देखा, उसने मेरे पिता को देखा। यह मैं तुम्हें अपने आप नहीं बता रहा हूँ, बल्कि मुझमें बसा पिता बता रहा है कि मैं पिता में बसता हूँ और पिता मुझमें।

७२. जब ज्योति जलाई जाती है, तो इसे छुपाकर नहीं रखें बल्कि ऐसी जगह रखें, जहाँ से यह सत्य के जिज्ञासुओं का ध्यान आकर्षित कर सके। प्रभु की सेना में भर्ती होने के लिए हमें क्या करना होगा ? इसका सीधा सा उत्तर है कि सदाचार के रास्ते पर चलो। सही रास्ते पर चलने के काबिल होने के लिए हमें अपनी जिंदगी को नेक विचारों, नेक कर्मों और विनम्र बोलचाल से परिपूर्ण करना होगा।

### नेक विचार

जब हम कोई बुरा विचार मन में लाते हैं या बुरा कर्म करते हैं, तो इससे बुराई की शक्तियों को ताकत मिलती है जो प्रभु का होना चाहते हैं उन्हें पवित्र आग में शुद्ध विचारों, नेक शब्दों और नेक कर्मों का ईंधन डालना होगा। इससे प्रभु या सत्गुरु को छोड़कर, सब कुछ जलकर भस्म हो जाएगा।

सदाचारी इंसान का मुख्य कर्तव्य है अपने दुश्मन से भी प्रेम करना और उसकों दोस्त में बदलने की कोशिश करना, दुराचारियों को सदाचार का रास्ता बताना और विवेक की ज्योति को दूर-दूर तक फैलाना।

आत्मा को सचे घर का रास्ता ढूँढने में सहायता करने से बढ़कर कोई और सेवा नहीं। इस उद्देश्य के लिए किसी भी प्रकार की निष्काम और सची सेवा प्रशंसनीय है। जिस जगह भी भक्ति की जाए, वह जगह पवित्र हो जाती है। गुरु-सत्ता के दयालु संरक्षण में, प्रेम के पानी द्वारा बंजर भूमि भी हरी भरी हो जाती है। गुरुसत्ता हर एक नामलेवा को उसकी जिंदगी में और शरीर छोड़ने के समय, हर संभव सहायता देती है। मुझे खुशी है कि आपकी माँ को भी यही अनुभव हुआ। आपको उनके बारे में कोई चिंता करने की जरूरत नहीं ।

सत्गुरु का अपने बच्चों के प्रति प्रेम असीम है और जितना अधिक इसका आनंद लिया जाए, उतना ही यह बढ़ता है। मैं चाहता हूँ कि प्रेम और सिर्फ प्रेम ही प्रिय बच्चों के बीच में पनपे ताकि दोहरेपन की सारी धूल धुल जाए।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

आज, मला संपूर्ण दिवस, माझ्या आयुष्यातील प्रत्येक दृश्य एखाद्या नाटकातल्या प्रसंगाप्रमाणे बघायचं आहे... माझ्या आजूबाजूचा प्रत्येक जण मग तो घरातला असो किंवा कामाच्या ठिकाणचा... तो माझा सहकलाकार आहे... मला स्वतःवर लक्ष केंद्रित करायचं आहे... मी एक शक्तिशाली आणि सुंदर अभिनेता आहे... माझ्या सहकलाकारांनी त्यांची भूमिका कशीही साकारली तरी माझे विचार, शब्द आणि कर्म ही माझी निर्मिती आहे... आज संपूर्ण दिवस मला स्वतःवर लक्ष केंद्रित करायचं आहे... भलेही इतर नेते काहीही म्हणोत, माझी काम गिरी प्रभावरहित, स्थिर आणि केंद्रित राहील. माझी भूमिका मी एकाग्रतेने साकारेन... माझी कामगिरी, माझे विचार आणि माझी वर्तणूक ही माझी निर्मिती आहे.... ओम शांती!

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

लोकांचं आपल्याप्रति वागणं हा बाह्य स्रोत आहे, ते आपल्या नियंत्रणात नाही. त्याला प्रतिक्रिया म्हणून जे विचार आपण निर्माण करतो ती अखंड ऊर्जा आहे, जी पूर्णपणे आपली निवड आहे.

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सतत एकाच पद्धतीने विचार केल्याने, बोलल्याने आणि वागल्याने त्याची सवय होते आणि मग लवकरच प्रतिक्रिया देण्याची हीच पद्धत अंगवळणी पडते. सवयींप्रमाणे प्रतिक्रिया देण्यासाठी आपण स्वत:च कारणीभूत असतो आणि त्यात बदल घडवण्याची निवड आपण करू शकतो.

आपण दिलेल्या प्रतिक्रियेबद्दल जेव्हा आपण इतरांना दोषी ठरवतो तेव्हा आपण आपली शक्ती त्यांच्या हातात देतो.

अस्तित्व व्हावे प्रेममय

सुरेश ओबेरॉय : आपल्या चर्चेला साजेसा शेर मला आठवतोय : उम्र भर हम यही ग़लती करते रहे, धूल थी चेहरे पर, आईना पोंछते रहे। (आयुष्यभर हीच चूक मी करत राहिलो, धूळ होती चेहऱ्यावर, पण आरसा पुसत राहिलो.)

शिवानीदीदी : हो, याबद्दलच आपण चर्चा करत होतो. इतर लोक आपल्याशी कसेही वागत असले तरी आपल्या विचारांची, शब्दांची आणि कर्मांची जबाबदारी आपणच असे घेतली पाहिजे. आजपासूनच, माझ्या मनात नकळत विचार आला, माझ्या तोंडून अमुक शब्द बाहेर पडले, मी त्याच्यावर अचानक हात उगारला ... शब्द आपल्या शब्दकोशात असताच कामा नयेत.

सुरेश ओबेरॉय : आपल्या मनावर धूळ साचली होती. शिवानीदीदी : कारण आपण अज्ञानावस्थेत होतो. सुरेश ओबेरॉय : जेव्हा खूप धूळ असते तेव्हा आपण समोरचं बघू शकत नाही. शिवानीदीदी : हो, गेली अनेक वर्षं ही धूळ आहे आणि ती असल्यामुळे आपण खरं, सत्य काय ते बघू शकलो नाही. आपण याच अवस्थेत होतो कारण अनेक

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुंबईकर - काय करता आपण?
पुणेकर - बिझिनेस आहे माझा!
मुंबईकर - कसला बिझिनेस आहे आपला?
पुणेकर - सेलिंग ऑफ सोफिस्टिकेटेड मेन्यूअल गारमेंट होल्डिंग डीवाईसेस!!
मुंबईकर - वा वा ! म्हणजे काय?
पुणेकर - पायजम्याचे नाडे विकतो मी!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

＊ भारतातील पहिले सुपरसौनिक रेजिमेंट इंजिन तेज कोणी लाँच केले आहे?

\- Hyprix

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

खरबुजापासून गरापासून थालीपीठ

खरबूज हे फळ सहसा जेवल्यानंतर खावे. कारण खरबुजामुळे जेवण उत्तमरीत्या पचते. जॅम, सरबत बनविता येते. खरबुजाचा गोड गर काढल्यानंतर उरलेल्या फिकट किंवा पिठात मळून पराठा बनवावा किंवा काकडीच्या कोशिंबिरीप्रमाणे कोशिंबीर करावी. खरबुजाच्या बिया या बडीशेपेसोबत मुखवासासाठी खाव्यात किंवा त्या बदाम-पिस्त्यासारख्या खाता येतात, तसेच मिठाई सजविण्यासाठी देखील त्यांचा वापर करता येतो. उन्हाळ्यामध्ये थंडाईच्या पेयातसुद्धा खरबुजाच्या बिया थंड व पौष्टिक म्हणून वापरता येतात. व थोडे पाणी मिक्सरमध्ये घालून त्या बारीक कराव्यात. हा रस गाळणीतून गाळून घ्यावा व खरबुजाच्या बिया गाळलेला रस भाजीच्या रश्शामध्ये किंवा आमटीमध्ये घालावा. तसेच सूप बनविताना घट्टपणा येण्यासाठी वापरावा. यामध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे व पौष्टिक घटक आहेत.

### खरबूज

सावधानता :

खरबूज हे कचे खाऊ नये. तसेच ते अति पिकलेले व जास्त दबत असणारे खाऊ नये. असे खाल्ल्याने उन्हाळ्यामध्ये जंतुसंसर्गाची बाधा होऊ शकते. तसेच जास्त काळ फ्रीजमध्ये ठेवलेले खाऊ नये.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# जागतिक ग्राहक दिनाच्या शासकीय कार्यक्रमावर संघटनांचा बहिष्कार





जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यासाठी शासनातर्फे नेवासा येथील तहसील कार्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमावर विविध ग्राहक संघटनांनी बहिष्कार टाकला.

नगर – जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यासाठी शासनातर्फे नेवासा येथील तहसील कार्यालयामध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमावर विविध ग्राहक संघटनांनी बहिष्कार टाकला त्यामुळे या कार्यक्रमांमधील सत्कार स्विकारले नाही व कार्यक्रमात सर्व संघटना, पदाधिकारी सहभागी झाले नाही.

जागतिक ग्राहक दिन हा ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शासनातर्फे दरवर्षी साजरा करण्यात येतो मात्र गेल्या काही वर्षांपासून शासनाकडून ग्राहक दिन दूर तालुक्याच्या ठिकाणी साजरा करून केवळ औपचारिकता पूर्ण करण्यात येतेय. याबाबत विविध संघटनांनी यापूर्वीही नाराजी व्यक्त केली होती. मात्र तरीही १५ मार्च रोजी शासनातर्फे जागतिक ग्राहक दिनाचा कार्यक्रम तहसील कार्यालय नेवासा येथे आयोजित केला होता. यावेळी संघटनांचे पदाधिकारी व सदस्य कोणीही व्यासपीठावरती बसले नाही सर्वांनी व्यासपीठाच्या समोर बसून शासनाच्या या कृतीचा निषेध केला.

जागतिक ग्राहक दिन या कार्यक्रमाद्वारे ग्राहकांची जनजागृती अपेक्षित आहे मात्र या कार्यक्रमासाठी कोणतीही पूर्वप्रसिद्धी न केल्याने किंवा ग्राहकांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रण न दिल्याने तेथे केवळ संघटनांचे पदाधिकारी सदस्य व विविध स्वस्त धान्य दुकानाचे मालक यांचीच उपस्थिती दिसली.

जागो ग्राहक जागो अशी घोषणा देतांना ग्राहकांना जागे करण्याचे जे शासनाचे कर्तव्य आहे त्यापासूनच शासन दूर गेल्याचे या कार्यक्रमातून वारंवार निदर्शनास येत आहे. शासनातर्फे हा कार्यक्रम प्रत्येक तालुक्यांमध्ये व शहरात मोक्याच्या ठिकाणी आयोजित करायला हवेत मात्र असे करण्याऐवजी काही तरी थातूरमातूर आयोजन करून जागतिक ग्राहक दिनाची केवळ औपचारिकता पाळली जाते या सगळ्या प्रकाराला संघटनांचा तीव्र विरोध आहे.

नेवासा तहसीलदार कार्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमालाही जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी यांनी दुर्लक्ष केले. जिल्हाधिकारी किंवा तत्सम कोणीही अधिकारी या कार्यक्रमाकडे फिरकलेही नाहीत. जागतिक ग्राहक दिन या दिवशी एक प्रकारे जिल्हा प्रशासनाने ग्राहक राजाचा अवमान केल्याची भावना ग्राहक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या मनामध्ये आहे. कार्यक्रम स्थळी लावण्यात आलेल्या फलकावर देखील हा कार्यक्रम जिल्हास्तरीय कार्यक्रम आहे असे कोठेही नमूद केलेले नव्हते.

त्याचीच प्रतिक्रिया कालच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकल्याने उमटली. या बहिष्कार कार्यक्रमात नेवासा नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष डॉ. घुले व नगरसेवक यांनी ही सहभागी होऊन शासनाच्या या निष्क्रियते बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली व या घटनेचा निषेध केला. प्रसंगी महाराष्ट्र ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

शासन या प्रकारातून बोध घेऊन अशा प्रकारच्या त्रुटी दूर करेल अशी अपेक्षा संघटनांनी व्यक्त केली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## देवी स्वरुप









भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनात शारदीय नवरात्रौत्सवाचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणारा शारदीय नवरात्रौत्सव आणि त्यानंतर येणारा विजयादशमीचा विजयोत्सव भारताच्या सर्वच प्रांतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. लौकिक आणि पारलौकिक, व्यावहारिक आणि आध्यात्मिक, व्यक्तिगत आणि सामूहिक, धार्मिक आणि सामाजिक तर भावनिक आणि सांस्कृतिक अशा विविधांगाने या उत्सवाचे स्वरुप आणि त्यामागे उभे असलेले रूपक समजावून घेणे आवश्यक ठरते. असुरी शक्तिविरुद्ध दैवी शक्ती जेव्हा जेव्हा युद्ध करते तेव्हा त्याचे प्रतीक आणि स्मरण म्हणून नवरात्र साजरे केले जाते. आदिशक्ती भगवती, दुर्गा भवानी हीच शारदीय नवरात्रोत्सवाची उपास्य देवता आहे. ती देवी विविध रूपांनी नटली आहे. भारताच्या प्रत्येक प्रदेशात तिची रूपे पाहायला मिळतात. महाराष्ट्रात ती जगदंबा किंवा भवानी नावाने प्रसिद्ध आहे. बंगालमध्ये हीच देवी दुर्गेचे रूप धारण करते. कर्नाटकात रेणुका किंवा यल्लमा तर म्हैसूर प्रांतात चामुंडादेवी या नावाने ती प्रसिद्ध आहे. देशात, राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरात देवी नानाविध रूपांनी पुजली जाते. तिची उपासना केली जाते आणि त्यातून शक्तिचा प्रत्यय भाविक घेत असतात. यातून राष्ट्रीय एकात्मताही साधली जाते. देशभरातील विविध प्रांतात भाषिक भिन्नता असूनही देवीची उपासना समान आहे. त्यातून एकात्मताही वाढते हे महत्त्वाचे.

देवीची उग्र आणि सौम्य अशी दोन रूपे पाहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही तिची सौम्य तर दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही तिची उग्र रूपे आहेत. याशिवाय भद्रकाली, महामारी, रक्तदंतिका ही तिची महारौद्र रूपे आहेत. चराचरात शक्तिरूपाने तीच उभी आहे. वैकुंठात महालक्ष्मी, शिवलोकात पार्वती, ब्रह्मलोकात सरस्वती रूपाने तीच नटली आहे. तीच वेदमाता, तीच सावित्री आहे. तीच जनककन्या सीता आहे. तीच भीष्मकन्या रुक्मिणी आणि वृषभानुसुता राधाही तीच आहे. विश्वाची शास्ती आहे. बाह्यतः ती. आनितेजाने झळकणारी असून, अंतरी सानतेजाने प्रकाशणारी आहे. दैवी रूपात ती असुरांचा तर आध्यात्मिक रूपात ती अज्ञानाचा नाश करते. महालक्ष्मी हे संपत्तीबल तर महासरस्वती हे ज्ञानबल आहे. सर्व सामर्थ्याने उभी राहिलेली तीच राष्ट्राची महान शक्ती आहे. या शक्तिचे पूजन करण्यासाठी नवरात्रौत्सव आहे.

– किशोर गांधी



ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन करणारे माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचे विद्यार्थी.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचे ऑलिम्पियाड परीक्षेत स्पृहणीय यश

नगर – नगर तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या ऑलिम्पीयाड परीक्षेत स्पृहणीय यश संपादन केले.

इंडियन टॅलेंट लिट्ल चॅम्प ऑलिम्पियाड आयोजित इंग्रजी व गणित परीक्षेत आर्वी गायकवाड, अर्जुन पवार, आयुष हजारे, अझान शेख, शिवन्या कुटे, अंशिका पवार, अन्वि लांडगे, अवधूत काळे, मितवा वाघ, प्रियांश कांबळे, क्रिती उबाळे यांनी सुवर्णपदके तर आयुष चोभे ह्याने रौप्यपदक प्राप्त केले. त्याचप्रमाणे सायन्स ऑलिम्पियाड फौंडेशन आयोजित इंग्रजी परीक्षेत वेदिका बोरूडे व गणित परीक्षेत आराध्या बानिया, नुतन कोहक, स्वराज शिंदे, सोफिया शेख व रूद्र शेडाळे ह्यांनी सुवर्ण पदके पटकाविली. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

या सर्व विद्यार्थ्यांना पर्यवेक्षिका नेहा केदारे, सविता पाटोळे, अर्चना केदार, सबा शेख, प्रिती कांबळे, अश्विनी घुसाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# गुडी पाडव्याच्या मुहूर्तावर एका गाडीवर एक गाडी फ्री

## महावीरा टीव्हीस शोरूममध्ये खरेदी करा आणि जिंकण्याची संधी मिळवा





गुडी पाडव्याच्या मुहूर्तावर महावीरा टीव्हीस शोरूममध्ये एका गाडीवर एक गाडी फ्री ऑफर सुरु करण्यात आली.

नगर – पाडव्याच्या आनंदाच्या सणानिमित्त, गुडी पाडव्याच्या मुहूर्तावर – एका गाडीवर एक गाडी फ्री! महावीरा टीव्हीस शोरूममध्ये खरेदी करा आणि जिंकण्याची संधी मिळवा. गुढीपाडव्याच्या सणानिमित्त महावीरा टीव्हीस शोरूम ग्राहकांसाठी खास ऑफर घेऊन आले आहे. गुडी पाडव्याच्या मुहूर्तावर १९ मार्च पर्यंत शोरूममध्ये वाहन खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकासाठी संधी उपलब्ध आहे.

शोरूममध्ये टीव्हीसच्या सर्व बाईक, मोपेड आणि इलेक्ट्रिक वाहनांचे मॉडेल्स उपलब्ध आहेत. ग्राहकांनी जे वाहन खरेदी केले, त्यावर त्यांना हमखास आकर्षक गिफ्ट मिळणार आहे. या गिफ्टमध्ये मिक्सर ग्राइंडर, टेबल फॅन, आणि सीलिंग फॅन यांचा समावेश आहे, जे त्यांच्या घरासाठी उपयुक्त ठरतील. याचसोबत, महावीरा टीव्हीस शोरूममध्ये लकी ड्रॉ देखील आयोजित केला गेला आहे. लकी ड्रॉमध्ये भाग घेण्यासाठी कोणतीही टीव्हीएस वाहन खरेदी करा आणि मोफत टीव्हीएस जेस्ट जिंकण्याची संधी मिळवा! लकी ड्रॉचे विजेते महावीर जयंती ३१ मार्च रोजी जाहीर केले जातील.

शोरूममध्ये ग्राहकांसाठी लोन सुविधा उपलब्ध आहेत, अनुभवी कर्मचारी ग्राहकांना मार्गदर्शन देतील आणि वाहन खरेदीची प्रक्रिया सोपी करतील. सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, गुडी पाडव्याच्या मुहूर्ताचा लाभ घेण्यासाठी आणि या संधीचा अनुभव घेण्यासाठी त्यांनी सिद्धी लॉन्सच्या शेजारी, एमआयडीसी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर येथील महावीरा टीव्हीस शोरूमला नक्की भेट द्यावी.

अधिक माहितीसाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल: ९८००७२१२१२ / ९१०२८९२१२१

# महाराष्ट्र स्टेट लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्सला चौथे स्थान

## मुंबई एफसीवर मोठा विजय, २६ मार्चपासून पुढील टप्प्यासाठी तयारी



महाराष्ट्र स्टेट लीगमध्ये चौथे स्थान पटकावणाऱ्या फिरोदिया शिवाजियन्स संघातील खेळाडू.

नगर – अहिल्यानगरच्या फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल संघाने WIFA महाराष्ट्र स्टेट लीग चॅम्पियनशिप स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात दमदार कामगिरी करत आपली छाप उमटवली आहे. पाच सामने पूर्ण झाल्यानंतर संघाने गुणतालिकेत चौथे स्थान मिळवले असून, महाराष्ट्रातील बलाढ्य संघांविरुद्ध खेळताना जिद्द, संघभावना आणि आक्रमक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

स्पर्धेतील सर्वात मोठा विजय फिरोदिया शिवाजियन्सने मुंबई एफसीसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध मिळवला. या सामन्यात संघाने आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली आणि स्पर्धेत आपली ताकद दाखवून दिली.

जीओजी फिन क्यू संघाविरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने लढाऊ वृत्ती दाखवली. सामन्याच्या पहिल्याच दहा मिनिटांत दोन गोलांनी पिछाडीवर पडलेल्या संघाने शानदार पुनरागमन करत २२ अशी बरोबरी साधली. विशेष म्हणजे हा संघ पुणे लीगचा विजेता असून, त्यामध्ये संतोष ट्रॉफीचे अनुभवी खेळाडू आहेत.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण ईस्ट एफसी विरुद्धच्या सामन्यातही फिरोदिया शिवाजियन्सने जिद्दीचा खेळ करत ०१ पिछाडीवरून ११ अशी बरोबरी साधली. तर मॅजिक मेड एफसी विरुद्धच्या सामन्यात संघाने उत्कृष्ट बचाव आणि नियोजनबद्ध खेळ करत १० असा महत्त्वपूर्ण विजय मिळवला. पहिल्या टप्प्यातील शेवटच्या सामन्यात नाशिक सिटी एफसी विरुद्ध संघाला २५ असा पराभव स्वीकारावा लागला. मात्र संपूर्ण स्पर्धेत संघातील खेळाडूंनी जिद्दीने लढत देत चांगली कामगिरी केली. या मोहिमेदरम्यान संघातील अनेक खेळाडूंना दुखापतींचा सामना करावा लागला. तरीही संघाचे फिजिओ डॉ. आश्री बगदादी यांनी खेळाडूंना लवकरात लवकर तंदुरुस्त करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

संघ परतल्यानंतर सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वालवेकर यांनी खेळाडूंचे स्वागत करून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. मुख्य प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी आणि व्यवस्थापक अभिषेक सोनवणे यांनीही खेळाडूंच्या जिद्दीचे, संघभावनेचे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. आता संघ तीन दिवसांची विश्रांती घेऊन पुन्हा सरावाला सुरुवात करणार असून २६ मार्चपासून सुरू होणाऱ्या पुढील टप्प्यासाठी जोरदार तयारी करणार आहे. संघ व्यवस्थापनाला विश्वास आहे की, फिरोदिया शिवाजियन्स पुढील सुपर लीग टप्प्यासाठी पात्र ठरत आणखी दमदार कामगिरी करेल.

# राष्ट्रीय लोकअदालतीत अहिल्यानगर जिल्ह्याचा राज्यात चौथा क्रमांक; ५९ हजार ४८ प्रकरणे निकाली; ५७ कोटी ७२ लाख रुपयांची वसुली

नगर – प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी भगवानराव कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. या लोकअदालतीत एकूण ५९ हजार ४८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ५७ कोटी ७२ लाख ३९ हजार ४३१ रुपयांची वसुली करण्यात आली. जिल्ह्यात आजपर्यंत झालेल्या सर्व लोकअदालतींपैकी ही सर्वाधिक यशस्वी लोकअदालत ठरल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दिली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बार असोसिएशन आणि सेंट्रल बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत नुकतीच पार पडली. या लोकअदालतीत दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश न वटल्याची (चेक बाऊन्स) प्रकरणे, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसानभरपाई प्रकरणे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, कौटुंबिक वाद, महावितरणाशी संबंधित समझोता प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे आपसातील समझोत्यासाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातील ५६ हजार ७५४ दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली, तर २ हजार २९४ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. तसेच विशेष मोहिमेदरम्यान १ हजार २२८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकअदालतीनिमित्त जिल्हा न्यायालय परिसर रांगोळी व फुलांच्या सजावटीने सुशोभित करण्यात आला होता. न्यायाधीश, विधिज्ञ, बँका व पतसंस्था, विमा कंपन्या, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी, पोलीस, विधी स्वयंसेवक, न्यायालयीन कर्मचारी तसेच विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने लोकअदालत यशस्वीरीत्या पार पडली.

# अहिल्यानगरमध्ये २८ व २९ मार्चला 'उर्जा उपचार पद्धती' यावर कार्यशाळा

## विना स्पर्श व विना औषध उर्जा उपचार पद्धती, आनंदी व सुदृढ जीवनासाठी उर्जा उपचार पद्धती



पूनम खाडे (एनर्जी हीलर)

नगर – आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणारा ताण, आजारपण आणि मानसिक अस्वस्थता दूर करण्यासाठी जगभर विना स्पर्श व विना औषध उर्जा उपचार पद्धती वेगाने लोकप्रिय होत आहे. भारतातही या उपचार पद्धतीकडे लोकांचा कल मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगरमध्ये उर्जा उपचार पद्धती या विषयावर दोन दिवसीय ऊर्जा उपचार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती सर्टिफाईड एनर्जी हीलर पूनम खाडे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना पूनम खाडे म्हणाल्या, आनंदी, सुदृढ व ताणरहीत जीवनशैलीसाठी ही उपचार पद्धती अत्यंत उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे. औषधाशिवाय आरोग्याचा राजमार्ग म्हणून ही उपचार पद्धती जगभरात ओळखली जाते.

ही कार्यशाळा विद्यार्थी, तरुण, नोकरदार, गृहिणी तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात एकाग्रता वाढविण्यासाठी, नोकरदारांना ऑफिसमधील ताण कमी करण्यासाठी, गृहिणींना घरातील सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांना सांधेदुखी किंवा कंबरदुखीसारख्या समस्यांमध्ये नैसर्गिक आराम मिळविण्यासाठी या प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या हातांमध्ये नैसर्गिक 'हीलिंग एनर्जी' असते. योग्य पद्धतीने तिचा वापर केला तर औषधोपचारांशिवाय आणि शरीराला स्पर्श न करताही अनेक आजारांवर आराम मिळू शकतो. या कार्यशाळेत ही ऊर्जा कशी वापरायची, तिच्या साहाय्याने स्वतःचे व इतरांचे आरोग्य कसे सुधारायचे याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

दोन दिवसांच्या या कार्यशाळेत सहभागींना हातांच्या साहाय्याने ऊर्जेतील दोष ओळखण्याची स्कॅनिंग पद्धत, शरीराला स्पर्श न करता उपचार करण्याची विना–स्पर्श हीलिंग पद्धती, स्वतःच्या आरोग्यासाठी सेल्फ हीलिंग तसेच दूर असलेल्या व्यक्तींना ऊर्जा पाठवण्याची डिस्टन्स हीलिंग यासारख्या तंत्रांचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन दिले जाणार आहे. ही कार्यशाळा २८ व २९ मार्चला सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत आय.एस.डी.टी., होर्मोकेअर लॅब समोर, निर्मल चेंबरमागे, लाल टाकी, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

ही कार्यशाळा सशुल्क असून दोन दिवसांच्या प्रशिक्षणासह हँडबुक व लाइफटाइम सपोर्टचा समावेश आहे. इच्छुकांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असुन त्यासाठी व अधिक माहितीसाठी पूनम खाडे, (योग प्राण विद्या ट्रेनर व सर्टिफाईड एनर्जी हीलर) यांच्याशी ८००७४८२६०८ या क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क साधावा.

# संस्कृत विषयातील उल्लेखनीय कार्यासाठी सौ.प्रियंका पोळ यांना 'उद्योगिनी पुरस्कार'



संस्कृत विषयातील उल्लेखनीय कार्यासाठी सौ.प्रियंका पोळ यांना 'उद्योगिनी पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

नगर – ब्राह्मण बिजनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन तर्फे स्व. गीता गोडबोले–धैसास स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा 'उद्योगिनी पुरस्कार' यंदा पोळ क्लासेसच्या संचालिका सौ.प्रियंका अभिजीत पोळ यांना प्रदान करण्यात आला. सर्व भाषांची जननी असलेल्या देवभाषा संस्कृत विषयाच्या प्रसारासाठी व शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला.

महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या कार्याची दखल घेणे या उद्देशाने BBN संस्थेच्या वतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. विविध उद्योग व व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना या माध्यमातून सन्मानित करण्यात येते. यंदाच्या पुरस्कारासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून तब्बल ७० महिला उद्योजकांनी आपली नामांकने दाखल केली होती.

पुण्यातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षकांच्या समितीमार्फत या नामांकनांची छाननी करण्यात आली. सर्व बाबींचा सखोल विचार करून अंतिम फेरीसाठी सात महिला उद्योजकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये प्रियंका पोळ यांची निवड विशेष ठरली. संस्कृत विषयाच्या अभ्यासाला चालना देणे, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतबद्दल आवड निर्माण करणे तसेच शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनवीन उपक्रम राबविणे या कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रोख पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते.

# तपस्या, सेवा, धर्म आराधना केल्याने जीवनाचे सार्थक होते

## ज्ञानप्रभाजी म.सा. यांचे प्रतिपादन; नवीपेठ जैन स्थानकात अनिता मुनोत यांची श्रध्दांजली सभा



स्व. अनिता मुनोत

नगर – संथाराव्रतधारी, तपस्वी अनिता राजकुमार मुनोत यांचे १ मार्च रोजी निधन झाले. त्यांची श्रध्दांजली सभा नवीपेठ जैन स्थानकात मधुर व्याख्याती ज्ञानप्रभाजी सरल म.सा., ओजस्वी वक्ता नवीनज्योतीजी म.सा. यांच्या सान्निध्यात आनंद चालिसा पाठ नंतर नवीपेठ प्रतिक्रमण मंडळाने ही श्रध्दांजली सभा घेतली. प्रतिक्रमण मंडळाच्या सदस्या अनिता मुनोत यांच्या मैत्रिणी नूतन चंगेडिया, सुनिता बोरा, सुनिता मुनोत, कल्पना गांधी, मनिषा मुनोत (धार्मिक परीक्षा बोर्ड) यांनी साश्रू नयनांनी मुनोत यांच्या आठवणींनसा उजाळा देत त्यांचा साधेपणा, धर्म, तपस्या, आराधना विषयक निष्ठा, सेवा, भक्तीभाव, उदारता, स्मित हास्य अशा विविध गुणांचे स्मरण केले.

यावेळी मार्गदर्शन करताना महासतीजी ज्ञानप्रभाजी सरल म.सा. म्हणाल्या की, जीवात्मा एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. जन्म मृत्युचे हे चक्र आत्म्यासह अनादी काळापासून चालू आहे. यातून कोणताही जीवात्मा वाचू शकत नाही, जोपर्यंत त्याला मोक्ष प्राप्ती होत नाही. जन्म आणि मृत्युच्या दरम्यान जगण्याचा प्रवाह वाहत असतो. मृत्यु ही अचानक घडणारी घटना नाही, ती एक प्रक्रिया आहे, जी जन्मापासूनच सुरू झालेली असते. ती शरीराचे आयुष्य कर्म पूर्ण झाल्यानंतर पूर्ण होते. ज्ञानी म्हणतात, जन्म आणि मृत्यु आपल्या हातात नाही, मात्र या दरम्यान जे जीवन आहे, ते कसे जगायचे हे आपल्या हातात आहे. अनिता मुनोत यांच्या सारखे त्याग, तपस्या, सेवा, उदारता, क्षमा, प्रेम, मैत्री, धर्म आराधना, भक्ती, परोपकार असे कार्य आपापल्या शक्ती नुसार जो करतो, त्यांचे जीवन सफल होते. जन्माला आल्याचे सार्थक होते आणि मृत्यु प्रश्नातही श्रेष्ठ उच्च कोटीचे जीवन प्राप्त होते. जिन शासन देव एवम् परमात्मा जिनेश्वर प्रभूंकडे प्रार्थना करतात की, स्वर्गवासी आत्म्यास शांती लाभो, पुढच्या जन्मी पुन्हा जिन शासन मिळवून साधनाव्दारे कर्म करून मोक्ष प्राप्ती होओ.

या सभेत पारसमल गुंदेचा (विनायकनगर), कांतीलाल गांधी (सारसनगर), राजकुमार मुनोत यांनीही श्रध्दांजली अर्पण केली. श्रध्दांजली सभेसाठी पारस लोढा, सुभाष भंडारी, चिराग गांधी, नवीपेठ जैन श्रावक संघाने नियोजन केले. शेवटी प्रतिक्रमण मंडळ, नवीपेठ, घासगल्ली, अलका मदनलाल कटारिया यांच्या प्रयत्नातून सर्व उपस्थितांना प्रभावना देण्यात आली.



श्री आनंदऋषी हॉस्पिटल आयोजित मोफत विविध रोग तपासणी शिबिरांतर्गत किडनीच्या विविध आजारांवरील तपासणी, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया संदर्भातील विशेष शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.

# समाजातील सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळावी

## पुष्पलता मंडलेचा यांचे प्रतिपादन; श्री आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी रोग तपासणी शिबिरास रुग्णांचा प्रतिसाद

नगर – समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. अनेक वेळा किडनीचे आजार सुरुवातीला लक्षात येत नाहीत आणि नंतर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या मोफत तपासणी शिबिरांमुळे रुग्णांना योग्य वेळी निदान व उपचार मिळण्यास मोठी मदत होते, असे प्रतिपादन पुष्पलता मंडलेचा यांनी केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. समाजातील गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य असून भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

श्री आनंदऋषी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत विविध रोग तपासणी शिबिरांतर्गत किडनीच्या विविध आजारांवरील तपासणी, मार्गदर्शन व शस्त्रक्रिया संदर्भातील विशेष शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये रुग्णांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक उत्तमचंद मंडलेचा, पुष्पलता मंडलेचा, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, सपना मंडलेचा, स्नेहल मंडलेचा व मंडलेचा परिवार, तसेच पंकज नाबरिया, लीना नाबरिया, प्रफुल्ल भंडारी, स्नेहल भंडारी, प्रमोद सोळंकी, प्रितेश दुग्गड, संजय सुराणा, पोपट लोढा व गणेश झंवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. गोविंद कासट, डॉ. प्राजक्ता पारधे, संतोष बोथरा, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमोद सोळंकी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आरोग्य हीच खरी संपत्ती असून प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैली, अयोग्य आहार आणि ताणतणाव यामुळे किडनीचे आजार वाढताना दिसत आहेत. त्यामुळे अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. ते पुढे म्हणाले की, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन आरोग्यविषयक उपक्रमांना पाठिंबा दिला पाहिजे. आनंदऋषी हॉस्पिटलने समाजसेवेच्या भावनेतून आयोजित केलेले हे शिबिर अत्यंत स्तुत्य असून यामुळे अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवले जावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. गोविंद कासट यांनी किडनीच्या आजारांबाबत सविस्तर माहिती देत रुग्णांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. किडनीचे आजार टाळण्यासाठी नियमित तपासणी, संतुलित आहार, पुरेसे पाणी पिणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. किडनीसंबंधित लक्षणे दिसल्यास दुर्लक्ष न करता तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन त्यांनी रुग्णांना केले. तसेच रोज कमीतकमी ७० ते ७५ रूग्णांचे या हॉस्पिटलमध्ये डायलिसिस होतात, आत्तापर्यंत सव्वा लक्ष रुग्णांचे यशस्वी डायलेसिस केले गेले. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. शिबिरात ७७ रुग्णांनी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला.

# नजरेचा शांत चोर ‘ग्लॉकोमा’

## वेळेवर तपासणीने अंधत्व टाळता येते

ग्लॉकोमा (काचबिंदू) हा डोळ्यांचा गंभीर आजार असून जगभरात कायमस्वरूपी अंधत्व येण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक मानला जातो. या आजाराला नजरेचा शांत चोर असे संबोधले जाते, कारण सुरुवातीच्या टप्प्यात या आजाराची ठळक लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे रुग्णांना बराच काळ काही त्रास जाणवत नाही आणि हळूहळू डोळ्यांच्या नसांवर परिणाम होऊन दृष्टी कमी होत जाते.

ग्लॉकोमामध्ये डोळ्याच्या आतल्या दाबात वाढ होते आणि त्यामुळे डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसांवर म्हणजेच ऑप्टिक नर्व्हवर परिणाम होतो. ही नस डोळ्यांमधील दृश्य माहिती मेंदूपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. या नसांना इजा झाल्यास सुरुवातीला बाजूची दृष्टी कमी होऊ लागते आणि उपचार न घेतल्यास हळूहळू कायमस्वरूपी अंधत्व येऊ शकते.

विशेषतः ४० वर्षांवरील व्यक्तींमध्ये, कुटुंबात काचबिंदूचा इतिहास असलेल्या व्यक्तींमध्ये, मधुमेह किंवा उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांमध्ये तसेच दीर्घकाळ स्टेरॉइड औषधे घेणाऱ्या व्यक्तींमध्ये ग्लॉकोमा होण्याचा धोका अधिक असतो. या आजाराची सुरुवातीला कोणतीही लक्षणे नसल्यामुळे नियमित डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

ग्लॉकोमामुळे झालेली दृष्टी परत मिळवता येत नाही, परंतु वेळेवर निदान आणि योग्य उपचारांमुळे पुढील नुकसान निश्चितपणे टाळता येते. डोळ्यांचा दाब मोजणे, डोळ्यांच्या नसांची तपासणी आणि व्हिज्युअल फील्ड चाचणी यांसारख्या तपासण्यांद्वारे ग्लॉकोमाचे लवकर निदान करता येते.

उपचारामध्ये प्रामुख्याने डोळ्यात टाकायचे औषधी ड्रॉप्स, लेसर उपचार किंवा आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया केली जाते. नियमित फॉलो–अप आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेतल्यास रुग्ण आपली दृष्टी दीर्घकाळ सुरक्षित ठेवू शकतो.

जागतिक ग्लॉकोमा सप्ताहानिमित्त नागरिकांनी विशेषतः ४० वर्षांनंतर वर्षातून किमान एकदा डोळ्यांची संपूर्ण तपासणी करून घ्यावी, असे आवाहन नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रफुल चौधरी यांनी केले आहे.

डॉ. चौधरी म्हणाले, काचबिंदू हा शांतपणे दृष्टी कमी करणारा आजार आहे. त्यामुळे कोणतीही लक्षणे नसली तरी नियमित डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेळेवर निदान आणि योग्य उपचार केल्यास अंधत्व टाळता येऊ शकते. आपल्या डोळ्यांची काळजी घ्या आणि नियमित तपासणी करा.

**– डॉ. प्रफुल चौधरी,**
नेत्रतज्ज्ञ स्वस्तिक आय इन्स्टिट्यूट स्वस्तिक हॉस्पिटल्स, सावेडी, अहिल्यानगर.
मोबा. ८२६१९३४८७२

# पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ.रंगोली जिरवणकर यांची आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत ओपीडी सेवा



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. याठिकाणी आता तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. रंगोली जिरवणकर दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी सकाळी ११ ते २ ओपीडी सेवा देणार आहेत.

डॉ. जिरवणकर या अनुभवी त्वचा रोग तज्ज्ञ असून वाघोली पुणे येथे प्रक्टीस करतात. आजकाल विविध कारणांमुळे त्वचा तसेच केसांच्या समस्या वाढल्याचे दिसून येते. डॉ. जिरवणकर या त्वचा व केसांच्या समस्यांवर प्रभावी उपचार करतात.

विविध त्वचारोग, सोरायसिस, गजकर्ण, मुरूम, पिंपल्सवर अत्याधुनिक उपचार, केमिकल फिलिंग, लेझर ट्रीटमेंट, चेहऱ्यावरील खडड्डुयांसाठी सीओटू ट्रीटमेंट, काळ्या डागांवर उपचार, क्रॉनिक डिसऑर्डर, केस गळतीवर उपचार, केसातील कोंडा, हेअर ट्रान्सप्लांट, लर्जी, सौंदर्य समस्या विषयी उपचार मार्गदर्शन केले जाईल.

या अत्याधुनिक उपचार सुविधांच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ७०३०९५९४९४.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी

## संजय राका यांचे प्रतिपादन; हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरात १०८ रुग्णांची तपासणी; अल्पदरात होणार शस्त्रक्रिया



आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन करताना संजय राका आदी.

नगर – सध्या सर्वच वयोगटांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असून अनेक वेळा चालता–बोलता व्यक्तीचा अचानक मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत आहेत. अशा परिस्थितीत तत्पर व उच्च दर्जाची सेवा देणारे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर रुग्णांसाठी नवसंजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन संजय राका यांनी केले. वाढत्या हृदयविकाराच्या पार्श्वभूमीवर समाजाची गरज ओळखून हॉस्पिटलमार्फत सुरु असलेली उत्कृष्ट आरोग्यसेवा देशभरात नावाजली गेल्याचे त्यांनी सांगितले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय राका, भारती राका, चंद्रकांत राका, अनिता राका, किरण राका, प्रितम राका, गौरव राका, सोनम राका, प्रिंकेश राका, दिव्यानी राका, अमोल राका, कोमल राका, शुभम राका, सायली राका, सौरभ राका, आदेश राका, ऐश्वर्या राका, रियान राका, मायरा राका, संतोष बोथरा, सुभाष मुनोत, महेंद्र कांकरिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. विनय छल्लाणी उपस्थित होते.

सोनम राका म्हणाल्या की, वर्षभरात विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करून आनंदऋषीजी हॉस्पिटलमार्फत गरीब व गरजू नागरिकांना उपचाराची संधी दिली जाते. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या आरोग्य मंदिरातून होत आहे. या सामाजिक कार्यात राका परिवाराला सहभागी होण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्डिओलॉजिस्ट डॉ. राहुल अग्रवाल यांनी सांगितले की, हॉस्पिटलमध्ये अल्पदरात सेवा देताना उपचाराच्या दर्जावर कोणतीही तडजोड केली जात नाही. रुग्णांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि आयातीत साधनांचा वापर केला जातो. बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी व अँजिओग्राफी यांसारख्या शस्त्रक्रिया अल्पदरात केल्या जातात. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अनेक शस्त्रक्रिया मोफतही केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिरात एकूण १०८ रुग्णांची हृदयरोग तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर येथील वासन टोयोटा शोरूममध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदीची लगबग

## ‘हाय रायडर’ हायब्रिड SUV ला ग्राहकांची पसंती, सणाच्या पार्श्वभूमीवर आकर्षक योजना, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे टोयोटा अर्बन क्रुझर हाय रायडर चर्चेत




नगर – मराठी नववर्षाचा प्रारंभ मानल्या जाणाऱ्या गुढीपाडवा सणाच्या मुहूर्तावर नवीन वाहन खरेदी करण्याची परंपरा जपत शहरातील वासन टोयोटा शोरूम, नगर–पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर येथे ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली. सणाच्या उत्साही वातावरणात अनेकांनी नवीन वाहनांची बुकिंग केली तसेच काही ग्राहकांनी नवीन SUV ची डिलिव्हरीही घेतली.

यावेळी विशेषतः टोयोटा अर्बन क्रुझर हाय रायडर या हायब्रिड SUV कडे ग्राहकांचा मोठा कल दिसून आला. अत्याधुनिक तंत्रज्ञान, आकर्षक डिझाइन आणि जास्त मायलेज यामुळे ही गाडी सध्या ग्राहकांमध्ये लोकप्रिय ठरत असल्याचे वाहन क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

वासन टोयोटा शोरूमकडून गुढीपाडवा निमित्त ग्राहकांसाठी विविध आकर्षक योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. नव्या वर्षाची सुरुवात नवीन वाहनाने करण्यासाठी अनेक ग्राहकांनी शोरूमला भेट दिली.

टोयोटा कंपनीने बाजारात आणलेली अर्बन क्रुझर हाय रायडर ही मिड–साईज SUV १.५ लिटर पेट्रोल इंजिनसह स्ट्राँग हायब्रिड तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. पेट्रोल इंजिनसोबत इलेक्ट्रिक मोटरही कार्यरत असल्याने इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत होते. कंपनीच्या माहितीनुसार या गाडीचे मायलेज सुमारे २७ किलोमीटर प्रति लिटर इतके आहे.

या SUV मध्ये एलईडी हेडलाईट्स, आकर्षक फ्रंट ग्रिल, अलॉय व्हील्स, प्रीमियम इंटीरियर, मोठी टचस्क्रीन इन्फोटेनमेंट प्रणाली, ३६० डिग्री कॅमेरा, पॅनोरॅमिक सनरूफ तसेच अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. मोठ्या वाहनांमध्ये टोयोटा फॉर्च्युनर आणि सिटी व्हेईकल लोकप्रिय असताना, बॅटरी व पेट्रोलच्या संयुक्त वापराची हाय रायडर हायब्रिड SUV देखील मोठ्या प्रमाणात मागणीमध्ये आहे. यापूर्वी मायक्रोचिपच्या तुटवड्यामुळे ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागायची, पण आता वाहन तत्काळ उपलब्ध आहेत, अशी माहिती अनिश आहुजा यांनी दिली.

# वाडियापार्क लेडीज क्लबची वार्षिक सभा

नगर – वाडिया पार्क लेडीज क्लब ची वार्षिक सभा १३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता श्रद्धा हॉटेल, सावेडी रोड या ठिकाणी झाली. सदर सभेत अंदाजे ५० सभासद हजर होते. २५–२६ सालचा वार्षिक अहवाल बक्षीसे इत्यादीचा या कार्यक्रमात वहापोहो झाला. या सत्राचे सूत्रसंचालन सेक्रेटरी संध्याकाळी संध्या गड्डुम यांनी केले. २५ सालातील अध्यक्ष सौ. हेमा नीसळ या होत्या. कार्यकाळ संपल्यामुळे पुढील तीन वर्षाकरिता नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. सर्वानुमते नवोदित अध्यक्ष नीलिमा आवटी यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष प्राध्यापक स्नेहा रानडे, खजिनदार मेधा वाळींबे, सरिता उदास, सेक्रेटरी सुनीता देव, मीना पाठक यांची निवड झाली. गेल्या ४० वर्षे खजिनदार या पदासाठी कार्यरत असलेल्या व सौ. मंदाताई सोमानी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय पदाचा कार्यभार स्वीकारताना ॲड. नीलिमा आवटी यांनी थोडेसे विवेचन केले. वाडिया पार्क लेडीज क्लब १९३१ स. स्थापन झाला. वाडिया नावाच्या त्या काळातील समाजसेविका यांनी तो स्थापन केला म्हणून या क्लबला वाडिया पार्क लेडीज क्लब असे नाव पडले. वाडिया पार्क मध्येच क्लब ची स्वतःची जागा होती त्या काळाला अनुसरून अनेक प्रकारचे कार्यक्रम त्या काळात राबवले गेले. प्रौढ शिक्षण वर्ग संस्कार वर्ग वेगवेगळी प्रदर्शने इत्यादी कार्यक्रम होते. त्या काळात सगळ्या थरातील महिला अत्यंत आनंदाने उत्साहाने भाग घेत होत्या पण काळाला हे पावलं नाही अतिक्रमण पडल्यामुळे क्लब ची जागा गेली अनेक प्रयत्न केले पण अपयश आले सदर क्लब हा रजिस्टर असून धर्मदाय आयुक्त चे सगळे नियम व कायदे तंतोतंत पाळले जातात अशा अडचणीच्या काळात सुद्धा आजपर्यंत हा क्लब नेताने चालू आहे पुढील तीन वर्षात आम्ही अनेक प्रकारचे कार्यक्रम राबवू प्रबोधनात्मक कार्यक्रम घेऊ वेगवेगळ्या स्पर्धा वेगवेगळे उपक्रम राबवून यांनी सांगितले.

अध्यक्ष जबाबदारी पेलताना सर्वच कार्यकारिणीचे व सभासदांचे सहकार्य मला लाभले आहे व लाभेल सुद्धा धन्यवाद खजिनदार जयश्रीताई डावरे यांचाही सत्कार करण्यात आला.



सारडा महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून सन्मान करताना प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वप्रथम TEL परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ६२ विद्यार्थ्यांचे यश

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी Train, Learn and Earn Program परीक्षेत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वप्रथम पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ICAI अंतर्गत TEL परीक्षेत ६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

प्राचार्यांनी आपल्या मनोगतात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे त्याचबरोबर प्राध्यापकांचे कौतुक केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे तसेच प्रबंधक अशोक असेरी, सीए अभय कटारिया आणि सीए प्रसाद पुराणिक उपस्थित होते. तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ. रमेश झरकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.प्रिया सारडा, प्रा.वीरेंद्र पाटील, प्रा.ओंकार भिंगारदिवे, प्रा.साक्षी अरोरा, प्रा.वरद हातवळणे आदी वाणिज्य शाखेतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळाले.

याप्रसंगी निर्गुना गायकवाड आणि यश भालोडी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वैभव तोडमल यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.वरद हातवळणे यांनी केले.

# जिद्द, चिकाटी आणि कष्टानेच स्पर्धा परीक्षेत यश

## पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांचे प्रतिपादन; सनफार्मा विद्यालयात आर.एस.पी. छात्र सैनिकांचा गौरव



ग्रामीण विकास मंडळ संचलित सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर येथे महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग व शिक्षण विभागाच्या अंतर्गत आर.एस.पी. (छात्र सैनिक) पथकातील गुणवंत, शिस्तप्रिय व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच मोठे ध्येय समोर ठेवून जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याचा संकल्प करावा. मोबाईलचे तंत्रज्ञान केवळ ज्ञान संपादनासाठी वापरणे योग्य आहे; मात्र विद्यार्थ्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यास, मैदानी खेळ आणि व्यायाम यासाठी देण्याचे आवाहन राखीव पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी केले.

ग्रामीण विकास मंडळ संचलित सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागापूर येथे महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग व शिक्षण विभागाच्या अंतर्गत आर.एस.पी. (छात्र सैनिक) पथकातील गुणवंत, शिस्तप्रिय व विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष बबनराव कातोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात उमेश परदेशी बोलत होते.

परदेशी पुढे म्हणाले की, ज्या प्रकारे एखाद्या इमारतीचा पाया मजबूत असतो, तेव्हाच त्यावर अनेक मजले उभारता येतात; त्याचप्रमाणे शालेय जीवन हा विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाचा भक्कम पाया आहे. या काळात घेतलेले शिक्षण, घडलेले संस्कार आणि केलेली मेहनत यामुळेच पुढे कोणत्याही क्षेत्रात मोठे पद गाठता येते. आज अनेक पोलीस अधिकारी शालेय जीवनापासून अभ्यास आणि परिश्रम करतच उच्च पदावर पोहोचले आहेत, त्यांच्याकडून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष बबनराव कातोरे यांनी संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, ड्रिल इन्स्पेक्टर व सहाय्यक फौजदार नितीन मोरे, आबासाहेब घिगे, मंगेश दाभाडे तसेच संस्थेचे उपाध्यक्ष शांताराम गाडे, संचालक रावसाहेब सप्रे, सुदाम भोर, प्राचार्य रावसाहेब सातपुते आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते.

वाहतूक रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात आर.एस.पी. पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून विविध जनजागृती उपक्रम राबवले जातात. रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देणे, ट्राफिक सिग्नलवर वाहतुकीचे नियमन, यात्रा काळात पार्किंग व वाहतूक व्यवस्थापन, रस्त्यावरील सूचना फलकांचे प्रात्यक्षिक, वाहनधारकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगणे तसेच नियम तोडल्यास होणाऱ्या दंडाबाबत जागरूकता निर्माण करणे असे उपक्रम विद्यार्थ्यांकडून राबवले जात आहेत.

हे सर्व उपक्रम आर.एस.पी. अधिकारी व समादेशक राज धस यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पोलीस मुख्यालयाच्या वतीने उमेश परदेशी यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच पोलीस मुख्यालयात झालेल्या प्रजासत्ताक दिन परेडमध्ये विद्यालयातील आर.एस.पी.च्या ७२ विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांचेही प्रशस्तीपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य रावसाहेब सातपुते यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकरराव बारस्कर यांनी केले.

# अर्थजगत

**देशातील डिजिटल व्यवहार क्रांतीने सर्वसामान्यांच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. मात्र, या सुविधेसोबतच सायबर भामट्यांचा धोकाही तितक्याच वेगाने वाढतो आहे. सर्वसामान्यांची कष्टाची कमाई एका क्षणात लंपास करणाऱ्या या प्रवृत्तींना लगाम घालण्यासाठी आणि ग्राहकांचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक वृद्धिंगत करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. डिजिटल फसवणुकीला बळी पडलेल्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांना योग्य नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एका नवीन आराखड्याचा प्रस्ताव मांडला असून, यामुळे सायबर गुन्हेगारांच्या विळख्यात अडकलेल्या ग्राहकांना मोठा आधार मिळण्याची शक्यता आहे.**

## सायबर फसवणुकीविरोधात आरबीआयचे 'सुरक्षा कवच

रिझर्व्ह बँकेच्या नियमन विभागाने जबाबदार व्यावसायिक आचरणासंदर्भातील विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदलांचा प्रस्ताव ठेवला आहे. या नव्या प्रस्तावाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, छोट्या रकमेच्या डिजिटल फसवणुकीसाठी तयार करण्यात आलेली नुकसानभरपाईची तरतूद. नव्या नियमांनुसार, ज्या ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक व्यवहारांद्वारे ५०,००० रुपयांपर्यंतचे नुकसान झाले आहे, त्यांना या नुकसानीच्या ८५ टक्के किंवा जास्तीत जास्त २५,००० रुपये (यापैकी जे कमी असेल ते) नुकसानभरपाई म्हणून मिळू शकतील. मात्र, यासाठी ग्राहकाने फसवणूक झाल्याची माहिती तात्काळ बँकेला देणे अनिवार्य असेल. ग्राहकांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत कळीचा ठरणार असून, यामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेतील ग्राहकांचे मनोधैर्य वाढण्यास मदत होईल. हितधारकांशी चर्चा केल्यानंतर हे निर्देश १ जुलै २०२६ पासून लागू होण्याची शक्यता आहे. या नियमावलीत बँक आणि ग्राहक यांपैकी नेमकी कोणाची चूक किंवा निष्काळजीपणा आहे, हे देखील स्पष्ट करण्यात येणार आहे.



भारतात सध्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस म्हणजेच 'यूपीआय', मोबाईल वॉलेट आणि ऑनलाइन बँकिंगचा प्रसार ग्रामीण भागापर्यंत झाला आहे. मात्र, या प्रगतीसोबतच फिशिंग हल्ले, ओटीपी घोटाळे, बनावट कस्टमर केअर कॉल्स आणि मालवेअरद्वारे होणारी फसवणूक आता नित्याची बाब झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, २०२४-२५ या वर्षात झालेल्या एकूण फसवणुकीच्या प्रकरणांपैकी तब्बल ६६.८ टक्के प्रकरणे ही कार्ड आणि ऑनलाइन फसवणुकीशी संबंधित होती. या काळात इंटरनेट बँकिंगशी संबंधित सुमारे १३,५०० गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यात ५२० कोटी रुपयांची रक्कम अडकली होती. ही गंभीर परिस्थिती पाहता, रिझर्व्ह बँकेने ५०० रुपयांपेक्षा जास्त असलेल्या प्रत्येक व्यवहारावर एसएमएस अलर्ट अनिवार्य करण्याचा आणि तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

नव्या आराखड्यानुसार, बँकांना ग्राहकांच्या तक्रारींवर ठराविक वेळेत उत्तर देणे बंधनकारक असेल. यामुळे नुकसान सोसलेल्या ग्राहकांना बँकांच्या चकरा मारण्यापासून आणि प्रशासकीय दिरंगाईपासून सुटका मिळेल. विशेष म्हणजे, जर ग्राहकाची थोडीफार चूक असेल तरीही, त्याने पाच दिवसांच्या आत फसवणुकीची माहिती दिल्यास त्याला अंशतः नुकसानभरपाई मिळू शकणार आहे. ही तरतूद ग्राहकांसाठी एक मोठी दिलासादायक बाब ठरेल.

केवळ नुकसानभरपाई देऊन सायबर फसवणुकीचे हे मोठे आव्हान पेलणे शक्य नाही, याची जाणीव रिझर्व्ह बँकेला आहे. अनेकदा डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि सायबर जोखमीबद्दलची अनभिज्ञता यामुळे ज्येष्ठ नागरिक, छोटे व्यापारी आणि प्रथमच डिजिटल व्यवहार करणारे लोक या जाळ्यात अडकतात. तसेच, बँका, दूरसंचार कंपन्या आणि पोलीस यंत्रणा यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने फसवणूक झालेले खाते गोठवण्यास आणि पैसे परत मिळवण्यास विलंब होतो. त्यामुळे या प्रस्तावित आराखड्याची खरी यशस्विता बँका किती वेगाने 'रिअल टाइम' फसवणूक शोधणारी यंत्रणा राबवतात, यावर अवलंबून असेल.

बँकांनी संशयास्पद व्यवहारांची त्वरित दखल घेणाऱ्या प्रणालींमध्ये गुंतवणूक करणे आता अनिवार्य झाले आहे. उच्च जोखमीच्या व्यवहारांवर मर्यादा घालणे आणि अधिक सुरक्षित प्रमाणीकरण यंत्रणा विकसित करणे, यामुळे फसवणुकीच्या शक्यता कमी होऊ शकतात. त्याचप्रमाणे, बँका आणि राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे. फसवणुकीची शक्यताच मुळापासून नष्ट करणे हे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. तोपर्यंत, रिझर्व्ह बँकेचा हा नवीन आराखडा ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारे एक भक्कम कवच म्हणून काम करेल, यात शंका नाही.



## फ्लॅटधारकांना दिलासा

**स्वतःच्या हक्काच्या घरात राहणाऱ्या सामान्य फ्लॅटधारकांसाठी मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत दिलासादायक निकाल दिला आहे. केवळ थोड्याफार रकमेची थकबाकी आहे या कारणावरून बिल्डर खरेदीदाराला घरातून जबरदस्तीने बाहेर काढू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. फ्लॅटचा ताबा परत मिळवण्यासाठी बिल्डरला आता कायदेशीर प्रक्रियेचाच अवलंब करावा लागणार आहे.**

कायदेतज्ज्ञांच्या मते, जर बिल्डरने एकदा फ्लॅटचा ताबा ( खरेदीदाराला दिला असेल, तर त्यानंतर पैशांच्या किरकोळ वादावरून तो ताबा बेकायदेशीर ठरवता येणार नाही. पैशांवरून वाद असल्यास बिल्डर थेट ग्राहकाला बेदखल करू शकत नाही. एकदा ताबा मिळाल्यावर पूर्ण कायदेशीर प्रक्रियेशिवाय तो परत घेता येत नाही. कथित थकबाकीचे कारण देऊन डेव्हलपर्स आता ताबा मिळवण्यासाठी शॉर्टकट (कलम ६ चा आधार) घेऊ शकणार नाहीत. थकबाकी वसुलीसाठी बिल्डरला आता घाईघाईने पावले उचलण्याऐवजी सामान्य दिवाणी खटला दाखल करावा लागेल. थकबाकी वसूल करायची असेल, करार लागू करायचा असेल किंवा रद्द करायचा असेल, तर त्यासाठी दिवाणी न्यायालयात जाणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांमध्ये न्यायालय करार, पेमेंटचे पुरावे आणि दोन्ही बाजूंच्या अधिकारांची सखोल तपासणी करेल.

### खरेदीदारांनी कोणती काळजी घ्यावी?

अशा कायदेशीर कचाट्यातून वाचण्यासाठी फ्लॅटधारकांनी आपले कागदपत्रे मजबूत ठेवणे गरजेचे आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या वकील निकिता राठी यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत, प्रत्येक व्यवहाराचा बँक ट्रान्सफर पुरावा जपून ठेवावा. विक्री करार नेहमी रजिस्टर्ड करून घ्यावा. अलॉटमेंट लेटर, पजेशन लेटर आणि बिल्डरशी झालेला सर्व पत्रव्यवहार सुरक्षित ठेवावा. न्यायालयाच्या या निर्णयामुळे बिल्डरांच्या अरेरावीला चाप बसणार असून प्रामाणिक फ्लॅटधारकांना मोठे संरक्षण मिळाले आहे.

## युद्धामुळे एलआयसीला हजार कोटींचा फटका

अमेरिका-इस्राइल-इराण युद्धाचा थेट फटका भारतीय जीवन विमा महामंडळाला (एलआयसी) बसला आहे. सरकारी मालकीच्या या विमा कंपनीच्या शेअर पोर्टफोलिओत तब्बल ७०,१०५ कोटी रुपयांची घसरण नोंदवण्यात आली आहे. यात बँकिंग क्षेत्र आणि लार्सन अँड टुब्रो कंपनीचे शेअर्स सर्वाधिक प्रभावित झाले आहेत.

२७ फेब्रुवारी रोजी युद्धाच्या घोषणेच्या एक दिवस आधी एलआयसीचा पोर्टफोलिओ १४.८८ लाख कोटी रुपयांचा होता. मात्र ९ मार्चपर्यंत तो घसरून १४.१७ लाख कोटी रुपयांवर आला. म्हणजेच अवघ्या काही दिवसांत ४.७ टक्के म्हणजे ७०,१०५ कोटी रुपयांचे नुकसान झाले. तसेच यंदा जानेवारीपासून ९ मार्चपर्यंत एलआयसीच्या पोर्टफोलिओत ७.१ टक्के म्हणजे १.०८ लाख कोटी रुपयांचा एकूण तोटा झाला आहे. पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यापासून सेन्सेक्स व निफ्टी ५० मध्ये सुमारे ४.५ टक्क्यांची घसरण झाली असून मिडकॅप व स्मॉलकॅप निर्देशांकांत सुमारे ५ टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे.




### बँकिंग शेअर्सना सर्वाधिक फटका

एलआयसीच्या एकूण नुकसानापैकी सुमारे २१.८ टक्के म्हणजे १५,२९३ कोटी रुपयांचा तोटा हा स्टेट बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय बँक आणि एचडीएफसी बँक या तीन बँकांच्या शेअर्समधील घसरणीमुळे झाला आहे.

युद्धामुळे महागाई वाढण्याची भीती आणि व्याजदर वाढण्याच्या शक्यतेने बँकिंग शेअर्सवर दबाव आला. त्यातच गेल्या काही महिन्यांत एसबीआयसह अनेक बँकांनी चांगली कामगिरी केली होती, त्यामुळे भू-राजकीय संकटात या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली. दुसरीकडे एलअँडटी कंपनीच्या शेअर्समध्ये सुमारे ११ टक्के म्हणजे ७,६०९ कोटी रुपयांची घसरण झाली.

## पोर्टफोलिओला मिळणार 'सुवर्णकवच

शेअर बाजारातील चढ-उतारांपासून सामान्य गुंतवणूकदारांच्या पैशांचे संरक्षण करण्यासाठी भांडवल बाजार नियामक 'सेबी'ने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. २६ फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या नवीन नियमांनुसार, आता 'ॲक्टिव्हली मॅनेज्ड इक्विटी म्युच्युअल फंड' आपल्या पोर्टफोलिओमधील काही हिस्सा सोने आणि चांदीमध्ये गुंतवू शकणार आहेत. या निर्णयामुळे गुंतवणूकदारांना शेअर बाजारातील पडझडीच्या काळात सोन्याच्या झळाळीचा आधार मिळणार आहे.

आतापर्यंत इक्विटी फंडांमधील उरलेला पैसा प्रामुख्याने रोख किंवा मनी मार्केटमध्ये ठेवला जात असे. मात्र, नव्या नियमांनुसार फंड मॅनेजर्सना पोर्टफोलिओच्या ३५ टक्क्यांपर्यंत रक्कम मौल्यवान धातूंमध्ये गुंतवण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

जेव्हा शेअर बाजार कोसळतो, तेव्हा सोने आणि चांदी सहसा चांगली कामगिरी करतात. अशा परिस्थितीत, पोर्टफोलिओमध्ये सोन्याचा समावेश असल्यास गुंतवणूकदारांचे नुकसान कमी होण्यास मदत होईल. विशेषतः जागतिक तणाव किंवा महागाईच्या काळात हे पाऊल मैलाचा दगड ठरेल.




सोन्यामुळे पोर्टफोलिओला स्थिरता मिळत असली तरी, गुंतवणूकदारांनी काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. जेव्हा शेअर बाजार तेजीत असेल, तेव्हा सोन्याच्या उपस्थितीमुळे फंडाचा एकूण परतावा थोडा कमी दिसू शकतो, कारण दीर्घकाळात सोन्याची वाढ इक्विटीच्या तुलनेत संथ असते.

### गुंतवणूकदारांनी काय काळजी घ्यावी?

या नवीन बदलामुळे 'ओव्हर-ॲलोकेशन'चा धोका निर्माण होऊ शकतो. जर तुम्ही आधीच गोल्ड ईटीएफ किंवा सॉव्हेरियन गोल्ड बॉंडमध्ये गुंतवणूक केली असेल आणि आता तुमच्या इक्विटी फंडानेही सोन्यात गुंतवणूक सुरू केली, तर तुमच्या एकूण पोर्टफोलिओमध्ये सोन्याचे प्रमाण प्रमाणाबाहेर वाढू शकते. जानेवारी २०२६ मध्ये गोल्ड ईटीएफमध्ये १०% आणि सिल्व्हर ईटीएफमध्ये २४% घसरण झाली होती. त्यामुळे मौल्यवान धातूही जोखमीपासून मुक्त नाहीत.

## अस्थिर बाजारातील गुंतवणूक सूत्रे



चालू वर्षाच्या सुरुवातीपासूनच जागतिक शेअर बाजारातील चढ-उतार आणि अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदार सध्या गोंधळलेल्या स्थितीत आहेत. अमेरिकेपासून भारतापर्यंत आणि युरोपपर्यंत सर्वच बाजारपेठांमध्ये आर्थिक धोरणे, वाढते व्याजदर आणि भू-राजकीय तणावामुळे अनपेक्षित बदल पाहायला मिळत आहेत. अशा कठीण काळात 'वॅन्गार्ड ग्रुप'चे संस्थापक आणि विनामूल्य इंडेक्स गुंतवणुकीचे जनक जॉन सी. बोगल यांची शाश्वत गुंतवणूक तत्वे मार्गदर्शक ठरत आहेत.

### १. गुणवत्तेवर लक्ष द्या, गोंगाटावर नाही

बाजारात दररोज येणाऱ्या बातम्या कधी भीतीदायक असतात तर कधी उत्साहाच्या. गुंतवणूकदारासाठी सर्वात मोठा धोका हा किमतीतील चढ-उतार नसून चुकीच्या आणि निकृष्ट दर्जाच्या शेअर्समध्ये अडकणे हा असतो. ज्या कंपन्यांचा पाया मजबूत आहे आणि ज्यांचे व्यवसाय मॉडेल शाश्वत आहे, अशाच कंपन्यांची निवड करावी. कमी खर्चाच्या इंडेक्स फंडांच्या माध्यमातून बाजाराचा मागोवा घेणे हा गोंगाटापासून दूर राहण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

### २. चक्रवाढ व्याजाच्या शक्तिवर विश्वास ठेवा

शेअर बाजार कितीही वर-खाली झाला तरी 'वेळ' हा गुंतवणूकदाराचा सर्वात मोठा मित्र असतो. जॉन बोगल यांनी नेहमीच लवकर गुंतवणूक सुरू करण्यावर आणि मिळालेला लाभांश पुन्हा गुंतवण्यावर भर दिला. अनेक दशकांच्या कालावधीत ही रणनीती संपत्ती निर्मितीसाठी चमत्कारिक ठरते. बाजारातील तात्पुरत्या घसरणीत डगमगून न जाता संयम राखणाऱ्या गुंतवणूकदाराला दीर्घकाळात मोठे फळ मिळते.

### ३. घाईघाईने निर्णय घेणे टाळा

आजचा बाजार अल्गोरिदम ट्रेडिंग, सोशल मीडियावरील चर्चा आणि बातम्यांच्या प्रभावाखाली असतो. यामुळे अनेकदा भीती किंवा लोभ निर्माण होतो, ज्यामुळे गुंतवणूकदार चुकीचे निर्णय घेतात. प्रत्येक हेडलाईन किंवा चार्टमधील बदलावर प्रतिक्रिया देण्यापेक्षा, आपल्या ठरवलेल्या गुंतवणूक योजनेवर (खर्पीशीींशपीं झश्ररप) शिस्तबद्धपणे ठाम राहणे गरजेचे आहे. भावनांच्या आहारी जाऊन केलेली खरेदी-विक्री अनेकदा तोट्याची ठरते.

### ४. आपल्या गुंतवणूक योजनेवर ठाम राहा

हे जॉन बोगल यांचे सर्वात प्रसिद्ध सूत्र आहे. महागाईची आकडेवारी, भू-राजकीय घटना किंवा मध्यवर्ती बँकांचे निर्णय यामुळे बाजारात तात्पुरती अस्थिरता येऊ शकते, परंतु यामुळे आपली दीर्घकालीन रणनीती बदलू नका. भीतीपोटी किंवा केवळ आकर्षणापोटी वारंवार दिशा बदलणे ही गुंतवणूकदाराची सर्वात मोठी चूक असू शकते.

### ५. जोखमीचे व्यवस्थापन करण्यासाठी विविधीकरण करा

जागतिक स्तरावर प्रत्येक देशाची आर्थिक चक्रे वेगवेगळी असतात. अशा वेळी भविष्यातील संधी किंवा धोका कुठे असेल, याचा अचूक अंदाज वर्तवणे अशक्य आहे. शेअर्स, रोखे आणि इंडेक्स फंड यांचा समावेश असलेले वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ स्थानिक घसरणीपासून संरक्षण देतात आणि वाढीच्या संधींमध्ये सहभागी होण्यास मदत करतात.

### ६. 'तज्ज्ञांच्या' अंदाजाबाबत सावध राहा

मोठमोठे पगार घेणारे रणनीतीकार आणि विश्लेषक देखील अनेकदा बाजारातील मोठे बदल ओळखण्यात अपयशी ठरतात. २००८ चे जागतिक आर्थिक संकट असो किंवा अलीकडील अचानक आलेली मंदी, दिग्गज तज्ज्ञांकडूनही चुका झाल्या आहेत. त्यामुळे केवळ भविष्यवाण्यांवर अवलंबून राहणे दिशाभूल करणारे ठरू शकते.

### ७. गुंतवणुकीचा खर्च कमीत कमी ठेवा

बोगल यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे 'लो-कॉस्ट इंडेक्स इन्व्हेस्टिंग'. गुंतवणुकीवरील उच्च शुल्क किंवा चार्जेस दीर्घकाळात तुमच्या परताव्याचा मोठा हिस्सा फस्त करतात. कमी शुल्काचे फंड किंवा ईटीएफ निवडल्यास बाजारातील कामगिरीचा जास्तीत जास्त फायदा थेट तुमच्या खिशात जातो. स्पर्धात्मक बाजारपेठेत हा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

## आर्थिक संकट वाढणार?

आखातातील युद्ध लांबल्यास त्याचा चलनाच्या विनिमय दरावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत जगाबरोबरच भारतातही महागाई वाढू शकते. खनिज तेलाचे दर आणि पेट्रोलियम पदार्थासह खतांचे दरही वाढू शकतात असे अर्थ मंत्रालयाच्या मासिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित चलनाच्या वित्तीय उत्पादनात गुंतवणूक करण्याची शक्यता वाढेल. अशा परिस्थितीत देशातील परकीय गुंतवणुकीवर परिणाम होऊन रुपयाच्या मूल्यावर याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.



इराणलगतच्या समुद्रातून जगातील २०% इंधन वाहून नेले जाते. मात्र इराणने या समुद्रातून चीनशिवाय इतर कोणत्याही देशांच्या जहाजांना जाऊ देणार नाही असे सांगितले आहे. त्याचबरोबर इराणने तेल उत्पादन करणार्या अनेक देशांच्या पायाभूत सुविधावर हल्ले केले आहेत. इराणच्या तेल उत्पादनावर आणि विक्रीवरही अमेरिकेच्या निर्बंधामुळे परिणाम झालेला आहे. अशा परिस्थितीत हे युद्ध शक्य तितक्या लवकर निवळण्याची आवश्यकता या अहवालात व्यक्त करण्यात आली.

१९९१ मध्ये ज्याप्रमाणे खनिज तेलाच्या किमती मध्यपूर्वेतील घडामोडीमुळे वाढल्या होत्या. तसा प्रकार युद्ध रेंगाळल्यास होऊ शकतो. अशा परिस्थितीत जागतिक ऊर्जा व्यवस्थेवर याचा परिणाम होऊ शकतो असे स्पष्ट करण्यात आले. युद्धामुळे आठवड्याभरातच खनिज तेलाच्या किमती ९ टक्क्यांनी वाढल्या आहेत. तर गॅसच्या किमती ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत.

सध्या तरी भारताची स्थूल अर्थव्यवस्था भक्कम आहे. परकीय चलन साठा ७०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे. चालू खात्यावरील तूट पहिल्या सहामाहीत केवळ ०.८ टक्के आहे. त्यामुळे देशातील महागाईचा दर आणि व्याजदर कमी पातळीवर आहे. मात्र युद्ध चिघळल्यास या सर्वच बाबीवर याचा परिणाम होऊ शकतो. सध्याच्या परिस्थितीतून मार्ग काढण्याची भारतीय अर्थव्यवस्थेची क्षमता आहे. त्याचबरोबर युद्ध थांबल्यानंतर भारत इतर देशापेक्षा वेगाने आगेकूच करू शकेल. कारण भारताचा विकासदर सध्या जगात सर्वात जास्त आहे.

## रिसेलचे घर घेताना...

नवीन घरांच्या वाढत्या किमतींमुळे मध्यमवर्गीय खरेदीदार आता जुन्या घरांच्या म्हणजेच 'रीसेल' बाजाराकडे वळू लागले आहेत. नोब्रोकरच्या ताज्या अहवालानुसार एक कोटी रुपयांपेक्षा कमी किमतीची नवीन घरे बाजारात मिळणे कठीण झाले असून बांधकाम व्यावसायिक आता प्रीमियम आणि लक्झरी प्रकल्पांवरच भर देत आहेत.



जमिनीच्या वाढत्या किमती आणि बांधकाम खर्चात झालेली वाढ यामुळे बांधकाम व्यावसायिक चांगला नफा मिळवण्यासाठी प्रीमियम प्रकल्पच आणत आहेत. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, चांगल्या शहरांमध्ये मध्यम आणि कमी किमतीची नवीन घरे आता अत्यंत कमी झाली आहेत. अनेक लोकप्रिय भागांमध्ये नवीन प्रकल्पांसाठी जागाच शिल्लक नसल्याने जुनी घरे पाडून नवीन इमारती बांधल्या जात आहेत.

### रीसेल घरे का फायदेशीर?

रीसेल घरे चांगल्या वस्तीत आणि तयार सुविधांसह मिळतात. शिवाय त्यांची किंमतही रास्त असते. नवीन घरांवर जीएसटी भरावा लागतो, त्यामुळे ती आणखी महाग पडतात. रीसेल घर घेतल्यास बांधकाम पूर्ण होण्याची वाट पाहावी लागत नाही, किरायावर राहून हप्तेही भरावे लागत नाहीत. खरेदीपूर्वी घर, सोसायटी आणि परिसर प्रत्यक्ष पाहता येतो. मात्र रीसेल घर घेताना काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**मालकी तपासा :** वकिलाकरवी गेल्या ३० वर्षांतील सर्व मालकांची नोंदणी तपासा. ज्याच्याकडून घर विकत घेत आहात, त्याच्याच नावावर शेवटची नोंदणी असल्याची खात्री करा.

कायदेशीर तपासणी : घर कोणत्या वादात अडकलेले नाही ना आणि सरकार त्यावर ताबा घेत नाही ना, हे तपासा.

**एन्कम्ब्रन्स सर्टिफिकेट घ्या :** या प्रमाणपत्रामुळे घरावर कोणतेही कर्ज किंवा वाद नाही, हे सिद्ध होते.

**परवानग्या तपासा :** प्रकल्पाची मंजुरी, बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, ऑक्युपन्सी सर्टिफिकेट आणि रेरा मंजुरी असल्याची खात्री करा.

**सोसायटी एनओसी घ्या :** विक्रेत्याचे देखभाल शुल्काचे थकबाकी नाही ना, याची खात्री करा आणि सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्या.

या क्षेत्रातील तज्ज्ञ काही धोक्याच्या गोष्टी सांगतात. मूळ कागदपत्रे नसतील, नोंदणीत खंड असेल, घरात अनधिकृत बदल केले असतील किंवा रोख रकमेत मोठी सवलत देण्याची ऑफर असेल तर अशा व्यवहारापासून दूर राहणेच हितावह आहे. एकापेक्षा जास्त मालक असल्यास सर्वांची संमती असल्याशिवाय खरेदी करू नका.

## पत्नीच्या नावाने गुंतवणूक का फायद्याची?

आजच्या धावपळीच्या युगात गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असूनही, भारतीय कुटुंबांचा 'बँक एफडी'वर असलेला विश्वास आजही अढळ आहे. सुरक्षितता आणि निश्चित परतावा यामुळे एफडी हा आजही पसंतीचा पर्याय आहे. मात्र, अनेकदा नोकरीपेशा व्यक्ती स्वतःच्याच नावाने एफडी करतात, ज्यामुळे त्यांना व्याजावर मोठा प्राप्तिकर भरावा लागतो. जर तुम्ही हीच गुंतवणूक तुमच्या पत्नीच्या नावाने केली, तर तुम्ही कायदेशीररीत्या हजारो रुपयांचा टॅक्स वाचवू शकता.



टीडीएसचा आर्थिक फटका कसा टाळाल?

नियमांनुसार, जर एका आर्थिक वर्षात एफडीवरील व्याज ५०,००० रुपयांपेक्षा जास्त असेल, तर बँका १० टक्के टीडीएस कापतात. जर पॅन कार्ड नसेल, तर हा टॅक्स थेट २० टक्क्यांपर्यंत जातो.

पत्नीच्या नावाचा फायदा

बऱ्याच कुटुंबांत पत्नी गृहिणी असते किंवा तिचे उत्पन्न कमी असते. जर तुमच्या पत्नीचे एकूण वार्षिक उत्पन्न टॅक्स मर्यादेपेक्षा (नवीन प्रणालीनुसार ४ लाख आणि जुन्या प्रणालीनुसार २.५ लाख) कमी असेल, तर एफडीच्या व्याजावर कोणताही टीडीएस कापला जात नाही. यासाठी बँकेत '१५जी' फॉर्म भरून तुम्ही टॅक्स वाचवू शकता.

एफडीवर मिळणारे व्याज हे तुमच्या एकूण उत्पन्नात मोजले जाते. समजा तुमचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपये आहे आणि तुम्हाला एफडीतून २.२ लाख रुपये व्याज मिळाले, तर तुमचे एकूण उत्पन्न १४.२ लाख रुपये धरले जाईल. यामुळे तुम्ही उच्च टॅक्स स्लॅबमध्ये येता आणि तुम्हाला जास्त टॅक्स भरावा लागतो. पण, जर ही एफडी पत्नीच्या नावाने असेल आणि तिचे स्वतःचे उत्पन्न नसेल, तर त्या व्याजावर तिला वैयक्तिक टॅक्स सवलतीचा फायदा मिळेल आणि तुमच्या उत्पन्नावरील टॅक्सचा बोजा वाढणार नाही.

जर तुम्हाला जॉइंट एफडी करायची असेल, तर पत्नीचे नाव 'फर्स्ट होल्डर' म्हणून ठेवा. अशा स्थितीत टॅक्सची गणना पहिल्या खातेदाराच्या उत्पन्नावर केली जाते, ज्यामुळे टॅक्स वाचवण्यास मदत होते. हा फायदा प्रामुख्याने ज्यांची पत्नी नोकरी करत नाही किंवा उत्पन्नाच्या कमी टप्प्यात आहे, त्यांना घेता येईल.

